# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेसनोट** **दि.०१/०९/२०२४**

## कुख्यात गुन्हेगार रोहित प्रविण धनवे टोळीवर एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे येथे मोक्का अंतर्गत कार्यवाही

---

आगामी गणेश उत्सव सणाचे पार्श्वभुमीवर मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, यांनी आगामी गणेश उत्सव सण हा आनंदात साजरा करता यावा यासाठी व्यापक प्रतिबंध कारवाईचा आराखडा तयार केला असुन त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवुन शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील २६ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील एकुण १५२ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

दि.०३/०७/२०२४ रोजी पहाटे ०२/३० वा.चे सुमारास फिर्यादी नामे विनोद राजबहादुर विश्वकर्मा वय ३७ वर्ष धंदा भंगार व्यवसाय रा. न्यु लकी स्कॅप सेंटर, सेक्टर नंबर १०, खंडेवस्ती, भोसरी पुणे मुळपत्ता मु.पो. बेसार, ता.बदलापुर जि. जवनपुर राज्य उत्तरप्रदेश याचे मालकीचे न्यु लकी स्कॅप सेंटर दुकानामध्ये, खंडेवस्ती, भोसरी पुणे या ठिकाणी आरोपी नामे १) रोहीत प्रविण धनवे वय २१ रा. प्रगती शाळेजवळ नेहरु नगर पिंपरी पुणे २) सागर अशोक पंडीत वय २५ रा सेक्टर नं १० खंडे वस्ती एमआयडीसी भोसरी पुणे ३) दिलीप ऊर्फ पाजी उर्फ सरदार इंद्रजीत चव्हाण रा नेहरु नगर पिंपरी पुणे व एक विधी संघर्षीत बालक यांनी दोन मोटर सायकल वर येवुन फिर्यादीस शिवीगाळ करुन दुकानातील पैशाबाबत विचारणा करुन फिर्यादीस दगड डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन फिर्यादीचे खिशातील रोख रक्कम २२,०००/- जबरदस्तीने काढुन घेवुन गेलेबाबत एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३४२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३११, ३५२, ३३३, ३५१(२), ११५(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयात रेकॉर्डवरील गुन्हेगार रोहीत प्रविण धनवे यास त्याचे साथीदारासह अटक करण्यात आले होते. गुन्हयाचे तपासामध्ये सदर गुन्हा टोळीने व संघटीतपणे केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयामध्ये **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(४) ची वाढ करण्यात आली आहे.** सदर टोळीचा प्रमुख हा रोहित प्रविण धनवे आहे. यातील आरोपी नामे रोहीत प्रविण धनवे वय २१ वर्ष रा. प्रगति शाळेशेजारी, नेहरुनगर, पिंपरी, पुणे हा कुख्यात गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी खालील प्रमाणे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

१) पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.नं. ११२४/२०२२ भा.दं.वि.कलम ३९२,३४
२) पिंपरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ६००/२०२३ भा.दं.वि. कलम ३९७,३९४,३८४,१४३,१४७ आर्म ॲक्ट ४(२७), क्रि.लॉ.अं ॲक्ट कलम ३,७ म.पो.का. कलम ३७(१)(३)

सदर टोळीतील इतर सदस्य २) **सागर अशोक पंडित** वय २५ वर्षे, रा. सेक्टर नं.१०, बुद्ध विहार शेजारी, खंडेवस्ती, एम.आय.डी.सी भोसरी, पुणे ३) **दिलीप ऊर्फ पाजी ऊर्फ सरदार इंद्रजित चौहान** रा. नेहरुनगर, पिंपरी, पुणे ४) **एक विधीसंघर्षग्रस्त बालक.**

सदर टोळीची खंडेवस्ती, नेहरुनगर, पिंपरी या भागामध्ये दहशत आहे. त्यामुळे सदर टोळी प्रमुख रोहित प्रविण धनवे व इतर टोळीतील सदस्य यांनी यापूर्वी सदर भागातील नागरिकांना अनेक वेळा उपद्रव केला आहे. परंतु त्याचे दहशतीमुळे त्यांचेविरुध्द कोणीही पुढे येऊन तक्रार देत नव्हते. सदर आरोपी यांनी कोणास यापूर्वी कुठल्याही प्रकारचा त्रास दिला असल्यास अथवा त्याचे बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्यांनी एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास मा.पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे सो., मा.सह.पोलीस आयुक्त श्री. शशिकांत महावरकर सो., मा.अपर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी सो., मा.पोलीस उपायुक्त, परि -३ श्री. डॉ. शिवाजी पवार सो, सहायक पोलीस आयुक्त एम.आय.डी.सी.भोसरी विभाग श्री. सचिन हिरे, श्री. गणेश जामदार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी. भोसरी पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली संतोष इंगळे, पोलीस उपनिरीक्षक एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशन यांनी केला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास डॉ. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड हे करीत आहेत.

(डॉ.शिवाजी पवार)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड